ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 11 | JULY - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# राधानगरी तालुक्यातील कामगार लढा एक दृष्टिक्षेप



प्रा.डॉ.पाडळकर व्ही.व्ही.
इतिहास विभाग प्रमुख, डी.पी.भोसले कॉलेज, कोरेगाव.

## सारांश ः

राजर्षी शाहूनी उभारलेल्या राधानगरी धरणामध्ये जलविद्युत प्रकल्प उभारला गेल्यानंतर तेथे कामगार वर्गाचा उदय झाला. परंतु कामगारांना कामगार कायद्यानुसार त्यांचे न्यायहक्क न मिळाल्यामुळे त्यांची अंमलबजावणी व्हावी म्हणून लढे उभारले. त्यास या लढयामुळे यश मिळाले. या लढयाचा प्रभाव राज्यातील कामगार लढयावर पडलेला दिसून येतो. त्याचे पडसाद राज्यातील राजकारणावर उमटलेले दिसतात.

## प्रस्तावना

औद्योगिक क्रांतीनंतर कामगार वर्गाचा उदय झाला. सुरूवातीच्याकाळात कामगाराकडून **13** ते **15** तास काम करून घेतले होते. परंतु त्यांना त्याचा योग्य मोबदला मिळत नव्हता. अशा असंख्य समस्यांना कामगारांना तोंड द्यावे लागत होते. त्यामुळे कामगारांनी आपल्या हक्कासाठी व न्यायासाठी जगात लढे उभारले. त्याला भारत अपवाद नव्हता. भारतामध्ये **19** व्या शतकाच्या उत्तरार्धात जरी औद्योगिकरणाचा प्रारंभ झाला असला तरी अल्पकाळात त्याचे जाळे देशातील विविध भागात विणले गेले. सुरूवातीच्या काळात मुंबई, कलकत्ता, अहमदाबाद, कानपूर येथे औद्योगिक केंद्रे झपाटयाने वाढली तशी तेथे कामगार वर्गाची निर्मिती झाली. सुरूवातीच्या काळात वृत्तपत्रांनी कामगारांच्या हक्क व न्यायासंदर्भात जागृती केली. त्यानंतर नारायणराव लोखंडे, महात्मा गांधी यांसारख्या नेत्यांनी कामगारांच्या संघटना स्थापन करून कामगार हक्कासाठी लढे उभारले. हे लढे सुरूवातीच्या काळात औद्योगिक क्षेत्रामध्ये होते. त्याचे लोण रेल्वे साखर कारखाने, तसेच असंघटित क्षेत्रामध्ये विस्तारले गेले. कॉम्रेड डांगे यांनी तर गिरणी कामगारांना एकत्रित करून अनेक लढे उभारले. त्यामुळे कामगारांची अनेक प्रश्न सुटले. त्यामध्ये कामाचे तास किमान वेतन साप्ताहिक सुट्टी, विमा अपघात, नोकरीची हमी, इ.प्रश्नाना यश मिळाले. या लढाईचे लोण राधानगरी तालुक्यातील जलविद्युत केंद्रामध्ये पसरलेले दिसून येतात. स्वातंत्र्य लढयाच्या अंतिम टप्प्यात व स्वातंत्र्योत्तर काळात राधानगरी तालुक्यातील जलविद्युत केंद्रामधील कामगारांनी, साखर कारखान्यातील व शेतमजुरांनी आपल्या मागण्यासाठी उभारालेल्या लढयावर या शोधनिबंधामध्ये प्रकाश टाकला आहे.

## राधानगरी तालुक्याचे भौगोलिक स्थान

राधानगरी तालुका हा कोल्हापूर जिल्हयातील असून सह्याद्रीच्या रांगामध्ये १६° १७° अक्षांश तर ७३° ७४° रेखाशांवर वसला आहे. सदर तालुका महाराष्ट्राच्या पश्चिमेला तर कोल्हापूर जिल्हयाच्या नैऋत्येला वसला आहे. या तालुक्याच्या पूर्वेला कागल तालुका, पश्चिमेस सिंधुदूर्ग जिल्हा व गगनबावडा तालुका, उत्तरेस पन्हाळा व करवीर तालुका व दक्षिणेस भुदरगड तालुका आहे. तालुक्याचे मुख्यालय 'राधानगरी' हे कोल्हापूर-फोंडा या राज्य महामार्ग क्र.१६ वर कोल्हापूरपासून ५५ कि.मी. अंतरावर वसले आहे. तालुक्याची समुद्रसपाटीपासूनची सरासरी उंची ७०० मिटर आहे. प्रशासनाच्या सोयीकरीता जिल्ह्याचे करवीर,

इचलकरंजी, गडहिंग्लज आणि राधानगरी असे चार उपविभाग केले आहेत. राधानगरी उपविभागामध्ये राधानगरी, भुदरगड व गगनबावडा हे तालुके समाविष्ट आहेत.[१]

राधानगरी तालुक्याची दक्षिण-उत्तर लांबी अंदाजे ५० कि.मी. असून पूर्व-पश्चिम रूंदी २० ते ५० कि.मी. इतकी आहे. तालुक्याच्या संपूर्ण क्षेत्रापैकी (८९२.३ चौ. कि.मी.) क्षेत्रापैकी अंदाजे ७२.४३ टक्के क्षेत्र हे टेकडया, घाट व पर्वत यांनी व्याप्त आहे. २४% भाग पिकाऊ व उरलेला ३.५७ टक्के क्षेत्र गवताळ आहे.[२] नद्या व प्राकृतिक रचनेनुसार तालुक्याचे चार विभाग पडतात. तालुक्यातून प्रामुख्याने दुधगंगा, भोगावती, तुळशी व धामणी अशा चार नद्या वाहतात. त्यामूळे नद्यानुसार तालुक्याचे दुधगंगा काठ, भोगावती काठ, तुळशी काठ (धामोड) व धामणी असे चार विभाग पडले आहेत.

राधानगरी तालुका भोगावती, तुळशी, दुधगंगा आणि धामणी या चार नद्यांच्या भागामध्ये विसावलेला असला तरी दुधगंगा, भोगावती व तुळशी नद्यांच्या काठावरच अधिक लोकसंख्या वसलेली आहे. पिकाच्या दृष्टीने महत्त्वाचे क्षेत्र म्हणजे भोगावती, तुळशी व दुधगंगा नद्यांच्या आजूबाजूचा प्रदेश होय. तालुक्याची पश्चिम किनारपट्टी भोगावती नदीला समांतर असून हा पट्टा सरासरी २० कि.मी. पूर्वभागाकडे पसरलेला आहे. तालुक्याची दक्षिण किनारपट्टी डोंगरदऱ्यांनी व्यापलेली आहे. तसेच या तालुक्याचे क्षेत्र साधारण उत्तर पश्चिमेकडून दक्षिण पूर्वेकडे निमूळते होत गेलेले आहे.

राधानगरी जलविद्युत केंद्रात १९५० मध्ये तीन हजार कामगार काम करत होते. या कामगारांना किमान वेतन कायदा, फॅक्टरी कायदा (ॲक्ट), लागू केला नव्हता. त्यामुळे १९४९ मध्ये कामगारांनी ए.जी.पडवळ यांच्या नेतृत्वाखाली कामगारांच्या समस्या सोडविण्याच्या दृष्टीने राधानगरी हायड्रो-इलेक्ट्रिकल कामगार वर्क्स या संघटनेची स्थापना केली. या संघटनेचे चिटणीस म्हणून वसंतराव सावंत काम पहात होते.[३]

५० च्या दशकात तालुक्यात अनेक चळवळी झाल्या. या चळवळीमध्ये कामगार चळवळीला महत्त्वाचे स्थान आहे. राधानगरी हायड्रो-इलेक्ट्रीकल विद्युत गृहामध्ये ३५०० कामगार होते. या कामगारांना कामगार कायदे लागू करावेत. यासाठी राधानगरी हायड्रोइलेक्ट्रिक या कामगार संघटनेच्या नेतृत्वाखाली चळवळ सुरू केली. तिचे नेतृत्व संघटनेचे सेक्रेटरी वसंतराव सावंत करत होते. संघटनेने प्रथम अर्ज, विनंत्या, शिष्टमंडळे याद्वारे सरकारकडे आपल्या मागण्या सादर केल्या. परंतू, सरकारने या मागण्यांकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे वसंतराव सावंतांच्या नेतृत्वाखाली कामगारांनी १६ जानेवारी १९५० रोजी एक दिवसांचा संप केला. या संपात तीन हजार कामगार उतरले होते. यावेळी कामगारांनी १९४८ चा फॅक्टरी कायदा लागू करावा, रोजंदारी कामगारांना कायम करावे, मार्च १९४९ चा महागाई भत्ता द्यावा, इत्यादी मागण्या केल्या.[४] या मागण्यांकडे सरकारने दुर्लक्ष केले त्यामुळे अगोदरच दिलेल्या इशाऱ्यानुसार कामगारांनी ६ फेब्रुवारी १९५० रोजी बेमुदत संप पुकारला. कामगार संप काळात दररोज एकत्रित जमून सरकारचा निषेध करत होते. त्यामुळे सरकारने खबरदारी म्हणून धरण प्रकल्पावर पोलीस बंदोबस्त ठेवला. कामगारांच्या या संपाला तालुक्यातून शेतकरी कामगार, शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन इ. पक्षांनी पाठींबा दिला. त्यामुळे कामगारांच्या चळवळीला बळ प्राप्त झाले. पुढे मुंबई प्रांतातील अनेक संघटनांनी या संपास पाठिंबा दिला. त्यामुळे सरकारने संप मोडून काढण्यासाठी विविध प्रयत्न केले. त्याचा एक भाग म्हणून सरकारने १० फेब्रुवारी १९५० रोजी संपाच्या पाचव्या दिवशी कामगार विरोधी पत्रक काढले. या पत्रकांत म्हटले होते की, ''राधानगरी हायड्रोइलेक्ट्रिक वर्क्स कामगार संघटना ही अनाधिकृत असून संपात सामिल झालेल्या कामगारांची संख्या २५० आहे. त्यामुळे काही यंत्रे वगळता उर्वरीत काम व्यवस्थित चालू असून उर्वरीत कामगारांनी कामावर ताबडतोब हजर रहावे अन्यथा त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल असा इशारा दिला''.[५] त्यामूळे कामगारांच्यात प्रचंड असंतोष निर्माण झाला. तर शेतकरी कामगार पक्षाने वरील पत्रकाचा कोल्हापूर शहर, राधानगरी इत्यादी ठिकाणी मोर्चे काढून निषेध केला. तर यावेळी सरकार काही कामगारांना हाताशी धरून कामगारांच्यामध्ये फुट पाडण्याचा प्रयत्न करीत होते. परंतु, कामगारांमध्ये एकी असल्यामुळे फुट पाडण्यात सरकारला अपयश आले. त्यामुळे सरकारने १७ व्या दिवशी वाटाघाटीसाठी कामगार संघटनेला आमंत्रण दिले. त्यानुसार सरकारच्यावतीने राधानगरी हायड्रोइलेक्ट्रिक चे व्यवस्थापक डी.एस.पी.श्री.राव तर कामगार संघटनेच्यावतीने ए.जी.पडवळ, वसंतराव सावंत यांच्यात वाटाघाटी होऊन आठ तासांचा दिवस, साप्ताहिक सुट्टी, मॅकेनिकल व इलेक्ट्रिकल खात्यातील ४० टक्के माहितीवरी नोकर समजणे, पगाराबाबत औद्योगिक कोर्ट जो निर्णय देईल तो मान्य इत्यादी मागण्या मान्य केल्या. त्यामुळे कामगारांचा दि. २३ फेब्रुवारी १९५० रोजी संप मिटला.[६] १९४८ मध्ये डाव्या पक्षांनी पुकारलेल्या संपानंतर देशात अनेक संप घडले. त्यातील हा एक महत्त्वपूर्ण संप झाला होता.

## शेतमजुरांचे आंदोलन

राधानगरी तालुक्यातील राशिवडे येथील शेतमजुरांनी किमान वेतनदाराची अंमलबजावणी व्हावी यासाठी आंदोलनाची तयारी केली. त्यामुळे विभागीय सहाय्यक जिल्हाधिकारी श्री.प्रधान साहेब यांनी शेतमजुरांच्या अंमलबजावणीसाठी जमिनदारांच्या बरोबर वाटाघाटी केल्या. परंतू या वाटाघाटीतून काहीही निष्पन्न न झाल्यामुळे शेतमजूरांनी १५ जानेवारी, १९८० रोजी आंदोलन सुरू केले. त्यामुळे जमिनदारांनी स्थानिक शेतमजुरांना कामावरच घेण्याचे बंद केले. त्यामुळे शेतमजूरांनी बापूसाहेब पाटील, शंकर धोंडी पाटील यांच्या नेतृत्वाखाली जमिनदारांच्या शेतावर सत्याग्रह केला. परिणामी आंदोलनाला वेगळे वळण लागण्याची चिन्हे दिसताच जिल्हाधिकाऱ्यांनी हस्तक्षेप करून किमान वेतनदराची अंमलबजावणी करण्यास जमिनदारांना भाग पाडले.[७]

राधानगरी तालुक्याच्या शेजारी असणा-या पण तालुक्याशी संबंधित असणा-या दी भोगावती सहकारी साखर कारखाना व दुधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना येथील कामगारांनी ॲडव्होकेट डी.एस. खांडेकर व कॉम्रेड गोविंदराव कलिक्ते यांच्या नेतृत्त्वाखाली आपल्या न्यायहक्कासाठी अनेक आंदोलने उभारली. या आंदोलनाला तालुक्यात असणा-या डाव्यापक्षांनी पाठिंबा दिल्यामुळे ही आंदोलने जनआंदोलने बनली होती. या आंदोलनामुळे साखर कारखान्यातील कामगारांचे प्रश्न सुटले गेले तर राजकीय क्षेत्रात गोविंदराव कलिक्तेसारखे आमदार बनल्यामुळे मतदार संघात कामगार वर्गाचा दबदबा राहिला.

## संदर्भ

१. दै.पुढारी, ३ जानेवारी, १९५०. पृष्ठ ३
२. दै.सत्यवादी, १८ जानेवारी १९५०. पृष्ठ १.
३. दै.पुढारी, ११ फेब्रुवारी, १९५०. पृष्ठ २.
४. दै.पुढारी, २४ फेब्रुवारी, १९५०. पृष्ठ १-४.
५. मुलाखत बळवंत संतराम पाटील, वय ८५, १३ मे, २००९. सकाळी ११.०० वा.
६. मुलाखत माजी आमदार आनंदराव देसाई वय ८२ ११ नोव्हेंबर २००७, संध्याकाळी ५.०० वा.
७. मुलाखत काका देसाई (माजी आमदार), वय ७८, ४ मे, २००५, सकाळी ११.०० वा.